https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852 E-ISSN: 3049-1541

KNOWLEDGE FLAME

INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)

(An International Indexed & Peer Reviewed Journal)

# दलित स्त्री वेदणेच्या ऋचा 'माझ्या जन्माची चित्तर कथा'

प्रा. डॉ. गणपती जोतीबा मोरे

स्व. नितीन महाविद्यालय, पाथरी

Email: ganpati more 69 @ Gmail. Com

**प्रस्तावना :**

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शिक्षणाचा प्रसार तळागळातील लोकांपर्यत पोहचला. भारतीय राज्यघटनेत 'एक व्यक्ती एक मत' यामुळे समाजातील सर्व स्तरातील लोकांना जीवनाच्या सर्व क्षेत्रात महत्व प्राप्त झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या दलित मुक्तीच्या आंदोलनातून त्यांच्या परिवर्तनातील विचाराने दलित समाज जो आजपर्यंत मूक होता तो जागा झाला व त्याला कंठ फुटला. म. फुले इत्यादी समाज सुधारकांच्या प्रयत्नातून समाजातील सर्वच तळातील समाजाचे लक्ष वेधले गेले. त्यांनी स्त्रियासाठी शिक्षणाची द्वारे खुली केली. यातून प्रेरणा घेवून दलित आणि ग्रामीण साहित्याची मोठया प्रमाणात निर्मिती होवून त्या प्रवाहांनी मराठी साहित्य समृध्द केले.

दलित साहित्यामध्ये कविता, कथा याच्यानंतर स्वकथने किंवा आत्मकथने मोठया प्रमाणात लिहीली. यातील कला आणि सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने 'माझ्या जन्माची चित्तर कथा' हे शांताबाई कांबळे यांचे महत्वाचे आत्मकथन होय. प्रस्तुत आत्मकथनातून समाजात स्त्री ही दुय्यम आहे. तिच्याकडे माणूस म्हणून पाहिले जात नाही. तीला पुरूषांच्या बरोबरीने जीवन जगण्यासाठी हक्क दिले जात नाहीत. समाजातील वरच्या वर्गातील स्त्रियांची ही स्थिती तर दलित स्त्रियांच्या वेदनेला तर मर्यादाच नाही. शांताबाई कांबळे यांनी आपण दलित आहोत नंतर स्त्री. दलित स्त्री म्हणून त्यांना कोणकोणत्या दुःखाना सामोरे जावे लागले. संघर्ष करावा लागला यांचा अविष्कार त्यांनी आपल्या आत्मकथनातून केलेला आहे.

दलित साहित्यातील आत्मचरित्रपर लेखनाला 'आत्मकथन' किंवा 'स्वकथन' म्हणावे आणि तोच शब्द जाणीवपूर्वक वापरावा असे समिक्षकांना वाटते. कारण आत्मकथन या शब्दापेक्षा स्वकथन हा शब्दप्रयोग वास्तव जगाशी निगडीत आहे. जे कल्पनेतील आहे त्याचा शब्दप्रयोग बुध्दीनिष्ठ होवू शकत नाही. म्हणून 'स्व कथन' या शब्दप्रयोगात 'स्व' ला आलेले अनुभव 'स्व' कथनातून आहे तसे मांडणे त्यात माणूस म्हणून जगण्याचा हक्क असून नाकारलेल्या जीवनाची व्यथा, वेदना दर्शविणारा आहे. "आपल्या आयुष्याचे निमित्त करून असे लेखन लिहीले जात असले तरी विशिष्ट घटनांचाच उल्लेख करून त्या-त्या अनुषंगाने अन्य समाजाच्या तुलनेत 'स्व' समाजाचा स्वतःचा शोध या लेखनात घेतांना दिसतो."[१] म्हणजे दलित आत्मकथनाच्या प्रेरणा या 'स्व' चा शोध व त्याला आलेले

आत्मभान या आहेत. जीवनात आलेले सर्वच अनुभव, घटना आत्मकथनातून घेतल्या जात नाहीत यात त्या लेखकाची कलादृष्टी व जीवनदृष्टीतून निवडीचा प्रभाव पडलेला असतो. स्वकथनांनी साहित्याचे स्थान अपूर्व असे योगदान दिले आहे. त्यातून व्यक्त होणारे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक लोकजीवन विलक्षन अनुभव देणारे आहे. दलित अनुभवसृष्टी साहित्य विश्वाला हादरून टाकणारी आहे.

१९८२-८३ मध्ये स्त्री जीवनाची शोशिक कहानी 'पूर्वा' मासिकातून क्रमशः प्रसिद्ध झाली होती. एका आदर्श शिक्षकेची अर्थात शांताबाई कृष्णाजी कांबळे यांची 'माझ्या जन्माची चित्तर कथा' होय. त्यांच्याच शब्दात सांगायचे म्हणजे "हे आयुष्य म्हणजे स्त्रीमुक्तीचा एक वस्तुपाठच आहे."[२] जे जगले ते भोगले ते त्यांनी कालानुक्रमे व सुत्रबद्ध पद्धतीने मांडले आहे. अत्यंत गरीब घरात जन्माला आलेल्या शांताबाईनी आठराविश्व दारिद्रयाशी सामना करून आपले सातवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करून शिक्षिकेचा व्यवसाय पत्कारला. पुढे शिक्षण विस्तार अधिकारी शिक्षण अधिकारी झाल्या. शांताबाईंना एका बाजुला कुशलकामामुळे मानसन्मान झाला. पहा केवळ दलित आणि महार जातीमुळे जीवनाच्या आलेखात अनेक चढउतार शोसावे लागले. एक तर स्त्री त्यातही दलित असलेल्या अस्पृश्य महार जातीत त्यांचा जन्म झाल त्यामुळे दारिद्रयाबरोबरच अस्पृश्यतेचे चटके आयुष्यभर बसत राहिले. लहानपनी शाळेत घरी दारी त्यांना आपण महार आहोत आपण अस्पृश्य आहोत याचा आलेला दाहक अनुभव त्या अंत्यत सोप्या भाषेत मांडतात. पण त्या दुःखाला वेदातील अस्थाचे रूप येते. "ए महाराचे पोंर! चल बाजूला हो मला शिवशील की! तुला दिसत नाय का! तुझे डोळ फुटल्यात."[३] एकदा तर भटाच्या सकूला बोलविण्यासाठी गेल्यावर सखूची आई ओरडली. म-हाचे पोर तिथंच उभी रहा, दारात रांगुळया घातल्यात त्या तुडवशील. या दोन प्रसंगातून लहान निरागस शांताला जानीव झाली की, आपण महार आहोत त्यामुळे इतर समाजाच्या मुलींच्या घरी-दारी आपणास प्रवेश नाही. आपल्या अंगाचा स्पर्श करण्याचा अधिकार नाही आपण माणूस असून आपला स्पर्श नाकारला जातो हा बालमनाला पडलेला प्रश्न आयुष्यभर सतत सलत राहील.

सातवी पास झाल्यावर शांताबाई शिक्षिका म्हणून रूजू झाल्या. पण जी जात नाही ती जात त्यांना सोडून गेली नाही. शिक्षिकेची नोकरी करीत असतांना सतत कुठे ना कुठे बडती होत असे अशा प्रसंगी शांताबाईंना राहण्याची व्यवस्था करण्याचा मोठा प्रश्न निर्माण व्हायचा. दलित असल्यामुळे गावात खोली मिळत नसे आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तितकाच उग्रपणे त्यांच्यापुढे उभा राहायचा. "कोण मास्तरीन आम्हाला ठावं नाय आपण महार आहोत असा मनाशी प्रश्न करून माघारी फिरने हा एक उपाय होता. साध्या हातातल्या बांगडया भरण्यासाठी सिता कासारीनही घोगंडे नेसते याचे कारण विचारल्यावर तुमचा मला विटाळ होईल म्हणून मी घोगंडी नेसले, घोगंडीने विटाळ होत नाही."[४] या संदर्भात डॉ. मनोहर जाधव लिहीतात. "दलित म्हणूनही जे दुःख शांताच्या वाटयाला येते ते वेगळे आणि नोंद घेण्यासारखे आहे. शांताबाई शिक्षिका असल्यातरी सर्वसाधारण शिक्षिका

म्हणून पाहण्यापेक्षा एक दलित महिला शिक्षिका म्हणून समाज त्यांच्याकडे पाहतो. त्यांच्या दलित असण्यामुळे जे प्रश्न निर्माण होतात ते सर्वसाधारण शिक्षिकेच्या प्रश्नापेक्षा भिन्न असतात.”[५]

दलित आत्मकथने इतर आत्मचरित्राप्रमाणे एका व्यक्तीची नसतात ती एकावेळी एकाव्यक्तीची असूनही ती सर्व दलित समाजाची सुख दुःखाची होतात. एक दृष्टीने ती सामुहिक अभिव्यक्तीची बनतात. कारण सर्व दलित समाजाचे दुःख एकच असल्यामुळे त्यात सामुहिकतेचे दर्शन घडते. म्हणून 'माझ्या जन्माची चित्तर कथा' हे शांताबाई कांबळे यांचे आत्मकथन त्यांच्या सुख दुःखाचा भोगलेल्या यातनामय जीवनाची कहानी नसून अवघ्या दलित दुःखभोगाची कहानी ठरते. शांताबाई कांबळे यांचे हे आत्मकथन किती श्रेष्ठ वाङमय गुणांनी नटलेले आहे. याविषयी पु. ल. देशपांडे लिहीतात. “मला तर नाना त-हेचे खाचखळग्यातून गेलेल्या आत्मचरित्राची लेखनशैली साधेपणामुळे आणि नेमक्या शब्दात घटनेचं चित्र उभ करण्याच्या ताकदीमुळे 'लीळाचरित्र' सारख्या महानुभवाच्या ग्रंथातल्या लेखनशैलीशी जुळणारी वाटली. एकनाथ माझा चुलतभाऊ ते आखिररित्या दत्तू घरी राहिला हया लेखनातल्या शब्दांचा कमालीच्या काटकसरीने केलेल्या उपयोगामुळे हया आत्मवृत्ताचा सूर कुठेही चढता सूर्य झाला नाही.”[६] आत्मचरित्रामध्ये आत्मप्रौढी किंवा आपल्या भूमिकेचे समर्थन करने चांगल्या आत्मकथनास बाधा आणणा-या या गोष्टी कुठेही आढळत नाही. मनाचा प्राजंळपणा आणि साधेपणामुळे या आत्मकथनाची उंची अधिकच वाढली आहे. असे म्हणता येईल.

**सारांश :-**

दलित स्त्रियांच्या आत्मकथनामध्ये जे काही कलात्मक आणि सामाजिक दुःखभोगाचे कुठेही उरबडवेपणा नसलेल्या ज्या कृती आहेत त्यात या आत्मकथाचा समावेश करता येईल. दलित स्त्री म्हणून जे दुःखभोग सोसावे लागते त्याचे संमंत चित्त असे चित्रण करून स्त्रियांच्या दुःखाला वाचा फोडली. या आत्मकथनामुळे समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोण निश्चित होईल असे वाटते.

**संदर्भ :-**

१) साहित्य ग्रामीण आणि दलित, (संपा) ईश्वर नंदापुरे, विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ.२००२, पृ.२९२
२) माझ्या जन्माची चित्तरकथा - शांताबाई कांबळे, सुगावा प्रकाशन, पुणे तिसरी आवृत्ती मा. पृष्ठ
३) समकालीन साहित्य चर्चा संपा, मनोहर जाधव व इतर प्रतिमा प्रकाशन, पुणे पृ.२४
४) माझ्या जन्माची चित्तरकथा, पृ.१५०.
५) दलित साहित्याचा इतिहास, म. सु. पगारे, प्रशांत पब्लिकेशन जळगाव २००५, पृ.१४७.